वाशिम जिल्हा पोलीस दल

Visit as

Website: www.washimpolice.gov.in

प्रेस नोट /21

दिनांक :- 08/12/2021

**पो.स्टे.शिरपुर येथील खूनाचे गुन्ह्यातील आरोपीस जन्मठेप.**

मा.पोलीस अधिक्षक,श्री.बच्चन सिंह यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारल्या पासून पोलीस दलातील कामांना गती मिळाली आहे. तसेच बेकायदेशीर कृत्य करणारांवर वचक निर्माण व्हावा याकरीता कोटांत चालणारे खटल्यातील पिडीतांना न्याय मिळावा व आरोपीतांना शासन व्हावे यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

ग्राम-शिरपुर येथे दि.२४.०५.२०१८ रोजी घडलेल्या घटनेचा फिर्यादी जगन्नाथ भिवाजी काटोळे, रा.शिरपुर यांनी रिपोर्ट दिला की, नमुद गुन्ह्यातील आरोपी धनंजय प्रल्हाद बोडखे,वय-३० वर्ष रा.भापुर ता.रिसोड हा फिर्यादी यांची मुलगी हिस तुला मुलीच होतात या कारणावरुन मारहान करत होता व याच कारणावरुन त्याने घटनेच्या दिवशी फिर्यादीची मुलगी हिस आरोपीने गळयास दोराने आवळून जिवाने मारुन टाकले व गळफास घेतला असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.शिरपुर येथे अपराध क्र.८६/१८ कलम-३०२, ४९८अ भादंवि. प्रमाणे गुन्हा दाखल झाले वरुन गुन्ह्याचा तपास पुर्ण होऊन मा.जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथे गुन्ह्याचा न्यायनिवाडा होणे करीता खटला सुरु होता.

दि.०८.१२.२०२१ रोजी मा.न्यायालयाने नमुद खटला क्र. ST.५९/२०१८ चा न्यायनिवाडा करतांना आरोपी नामे- धनंजय प्रल्हाद बोडखे,वय-३० वर्ष रा.भापुर ता.रिसोड यास **विदयमान जिल्हा व सत्र न्यायाधिश क्र.०१ श्री.एस.एम.मेनजोगे** यांनी कलम-३०२ भादंवि. प्रमाणे **जन्मठेपची** शिक्षा ठोठावली आहे. सदर गुन्ह्यात सरकारचे वतीने सर.अभियोक्ता म्हणून अॅड.श्री.व्यवहारे यांनी काम पाहीले आहे. नमुद गुन्हयातील पिडीतेस न्याय मिळवुन देण्यास मदत केली.

तसेच पोनि.श्री.बाबुसिंग राठोड व पोउपनि. गणेश मुपडे, पो.स्टे.शिरपुर यांनी सदर गुन्ह्याचा प्राथमीक तपास केला व मुख्य तपास पो.नि.श्री.हरिष गवळी.पो.स्टे.शिरपुर यांनी केला असून चार्जसिट पोनि.श्री.नाईकनवरे पो.स्टे.शिरपुर यांनी केला आहे. दरम्यान तपास सहाय्यक म्हणून पो.हे.कॉ./९१६ संतोष पाईकराव यांनी काम पाहीले आहे. तसेच सदरचे खटल्यात कोर्ट पैरवी म्हणून नापोकॉ./१०६७ भिमराव गवई व म.पोकॉ./१४७९ ममता इंगोले पो.स्टे.शिरपुर यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.

पोलीस निरीक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम.